महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, ४१२-ई, बहिरट पाटील चौक,
शिवाजी नगर, पुणे-४११०१६.

web : www.dhepune.gov.in E-mail- schol.dhepune@gov.in

फोन नं -०२०/२९७०७०९८

क्र. उशिंस -शिष्य/२०२४-२५/मुमोशि/E- ९७१००६ दिनांक- /०२/२०२५

प्रति,

१. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण .
२. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे,

विषय - राज्यातील मुलींना उच्च शिक्षणासाठी शिक्षण शुल्क व परीक्षाशुल्काचा ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ देण्यासाठीच्या शासन निर्णयाच्या प्रभावी अंमलबजावणीबाबत. . .

संदर्भ -१. संचालनालयाचे पत्र दि. दि. १२/०७/२०२४, दि. २२/०७/२०२४, दि. २३/७/२४.
२. शासनपत्र क्र. विवाक-२०२५/प्र.क्र. १८/तांशि-४, दि. ३० जानेवारी, २०२५.

उपरोक्त विषयी शासन निर्णय, दि. ८.०७.२०२४ अन्वये राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.8.00 लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे. अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील, इतर मागास प्रवर्गातील. सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या 50 टक्के लाभा ऐवजी 100 टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष 2024-25 पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच शैक्षणिक शुल्क व परीक्षा शुल्क यामध्ये 100 टक्के सवलत देण्याच्या योजनेचा लाभ, कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. 8.00 लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या), महिला व बाल विकास विभाग, शासन निर्णय दि.06.04.2023 मध्ये नमूद केलेल्या "संस्थात्मक" व "संस्थाबाह्य" या वर्गवारीमध्ये समाविष्ट होणाऱ्या अनाथ मुले व मुली यांना सुध्दा अनुज्ञेय करण्यात आलेला आहे. त्यानंतर शासन निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी होण्याच्या अनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि. १९/०७/२०२४ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील संबंधित संस्था व संचालनालयांना सूचना दिलेल्या आहेत.

उच्च व तंत्रशिक्षण विभागाद्वारे विद्यार्थी हिताच्या दृष्टीने राबविण्यात येणाऱ्या उपरोक्त योजनेसह विविध शिष्यवृत्ती योजनांबाबतची माहिती देण्याकरिता राज्यातील सर्व विद्यार्थी पालक व संस्था प्रतिनिधी यांच्याशी मा. मंत्री , उच्च व तंत्रशिक्षण

विभाग, यांनी दि. २५ जुलै, २०२४ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० दरम्यान webinar च्या माध्यमातून संवाद साधला असून सदर webinar जवळपास एकुण १७ लक्ष विद्यार्थी, पालक, संस्थांचे प्रतिनिधी इ. उपस्थित होते. या योजनेच्या अनुषंगाने संस्था स्तरावर कार्यवाही होत नसल्यास, शासनास / संचालनालयास तक्रार करणेकरिता संचालनालयाच्या संकेतस्थळावर दुरध्वनी क्रमांक व मदत करणेस तिकिट लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे.

उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करूनही काही शैक्षणिक संस्था अदयापही दि. ०८/०७/२०२४ रोजीच्या शासन निर्णयाची अंमलबजावणी करत नसल्याची बाब निदर्शनास येत आहे. असे शासनाने कळविले आहे. शासनपत्रातील बाब विचारात घेता मुलींना मोफत व्यावसायिक शिक्षण योजना सर्व स्तरावरील विद्यार्थिनींपर्यंत पोहोचेल यासाठी अर्ज करणेसाठी खालील बाबींचे मार्गदर्शन विद्यार्थिनींना करावे.

१. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योनजनेचे अर्ज भरताना साधारणत: उत्पन्न प्रमाणपत्र, महाराष्ट्र अधिवास प्रमाणपत्र, जातीचा दाखला इत्यादी कागदपत्रे आवश्यक असतात.

२. शिष्यवृत्तीसाठी आधार क्रमांकाचा वापर करुन अर्ज भरता येतो.विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा होणारआहे.त्यामुळे शिष्यवृत्ती रक्कम जमा होण्यासाठी विद्यार्थ्यांना त्यांचे बँक खात्याशी आधारक्रमांक संलग्न करणे आवश्यक आहे.

३. शिष्यवृत्तीचे शासन निर्णयअटी-शर्ती देय लाभ यांचे अवलोकन करुन विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावा.

४. विद्यार्थ्यांने ऑनलाईन अर्ज भरतांना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे अचूक भरुन ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्वकागदपत्रांसह आपल्या महाविद्यालयांकडे पुढील कार्यवाहीकरीता सादर करावी.

५. ऑनलाईन अर्ज भरतांना काही अडचणी निर्माण झाल्यासआपल्या महाविद्यालय/ संस्थेच्या मदतीने पूर्ण करुन घेण्यात यावेत.

महाविद्यालयांनी करावयाची मदत/मार्गदर्शन -

३. शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करणेसाठी महाविद्यालयांनी संगणक, प्रिंटर,इंटरनेट इत्यादी सेवा नि:शूल्क उपलब्ध करुन द्यावे.

४. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरणेसाठी आवश्यक कागदपत्रे (उत्पन्नदाखला, रहिवासी दाखला इ.) त्वरीत प्राप्त होणेसाठी तहसिलदार/उपविभागीय कार्यालयांमार्फत महाविद्यालयात शिबिर आयोजित करण्यात यावेत.

३. महाविद्यालयांनी शिष्यवृत्ती निहाय आवश्यक कागदपत्रे विद्यार्थ्यांनी पोर्टलवर अपलोड केली असल्याची खात्री करावी. तसेच संबंधित विद्यार्थ्याने अर्जामध्ये भरलेली (अभ्यासक्रमाचे नाव, अभ्यासक्रमाचा प्रकार (अनुदानित/ विनाअनुदानित) अभ्यासक्रम कालावधी, प्रवेशाबाबतची माहिती (Admission Details) टक्केवारी, शिष्यवृत्तीलाभ इ. काळजीपूर्वक पडताळणीकरणेआवश्यकआहे.)

४. महाविद्यालयाच्या लिपिकांनी त्यांचे लॉगीनवर आलेल्या अर्जावर तातडीने कार्यवाही (Approve / Reject / Sent Back) करावी. महाविद्यालयाच्या लिपिकांनी मंजूर (Approve) केलेले शिष्यवृत्तीचे अर्ज पडताळणीसाठी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य लॉगीनवर पाठवावे.

५. महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी महाविद्यालयांच्या लिपिकांप्रमाणे विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती अर्जाची पडताळणी करुन सदर अर्जावर तातडीने (Approved / Reject / send Back) कार्यवाही करावी.

६. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून आवश्यक कागदपत्रे उपलब्ध होताच शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरुन घेऊन पात्र अर्ज तसेच महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले अर्ज संबधीत विभागाकडे विहीत कालमर्यादेत सादर करावीत.

७. विद्यार्थीनींना शिष्यवृत्तीचे अर्ज भरताना येणाऱ्या अडचणींचे समाधान महाविद्यालयातील शिष्यवृत्ती नोडल अधिकारी यांनी तात्काळ करावे.

तसेच संबधित विभागीय सहसंचालकांनी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज, आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत अपलोड असणारे व ज्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रक्कम बरोबर दर्शविली आहे अशाच विद्यार्थिनींचे अर्ज संचालनालयाच्या (DHE Login) वर मंजूरीसाठी तात्काळ पाठविण्यात यावेत.

८. विद्यार्थिनींना, मुलींना मोफत शिक्षण योजनेची सविस्तर माहिती देण्यात यावी व विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त अर्ज भरुन घेण्यात यावेत. कोणतीही विद्यार्थिनी सदर शिष्यवृत्ती योजनेपासून वंचित राहणार नाही याची दक्षता महाविद्यालयांनी घ्यावी.

तसेच सदर बाबतचा संकलीत अहवाल संचालनालयास सादर करण्यात यावा.

तसेच मुलींना मोफत शिक्षण योजनेची प्रभावी पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी सदर योजनेची सर्वसाधारण माहिती सर्व अधिनस्त विद्यापीठ / महाविद्यालय यांना त्यांचे संकेतस्थळ / नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावेत.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 03-03-2025 19:07:19
(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)
प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे - 1.